## परिशिष्ट 'क'

### [ पहा पृष्ठ ८ वरील परिच्छेद १ ]

### पोलीस पाटलांना समन्से बजावण्याबाबतच्या सूचना

**(शासन निर्णय, गृहविभाग, क्रमांक १०८९-४, दिनांक २९ जानेवारी १९३७ चे सहपत्र).**

**समन्से**

(एक) दंडाधिकाऱ्यांनी काढलेली समन्से आणि तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी काढलेले आदेश बजावण्याचे काम पोलीस पाटलांनी करावयाचे असते व म्हणून त्यांना पुढील सूचना देण्यात येत आहेत.

(दोन) जेव्हा फक्त एका व्यक्तीवरच समन्स बजावयाचे असते तेव्हा समन्सच्या दोन प्रती असाव्यात. जेव्हा ते एकापेक्षा अधिक व्यक्तींवर बजावयाचे असते, तेव्हा जितक्या व्यक्तींवर समन्स बजावयाचे आहे अशा त्यांच्या संख्ये-एवढ्या जादा प्रती असाव्यात. समन्सची दुसरी प्रत मिळाल्याचे निदर्शक म्हणून समन्सच्या मूळ प्रतीवर त्या व्यक्तीची सही किंवा आंगठ्याचा ठसा घ्यावा. यास मूळ समन्स म्हणतात व त्या व्यक्तीला दिलेली प्रत ही 'दुसरी प्रत' असते.

**समन्स बजावण्याची पद्धत**

(तीन) (१) मूळ समन्सच्या पुस्तकात दिनांक घालून मग दुसरी प्रत मिळाल्याची खूण म्हणून त्या व्यक्तीची सही किंवा आंगठ्याचा ठसा घेऊन नंतर समन्सची दुसरी प्रत तिला द्यावी.

(२) ज्या व्यक्तीवर समन्स बजावयाचे असेल ती व्यक्ती योग्य ते परिश्रम घेतल्यानंतरही सापडत नसल्यास, दुसरी प्रत ज्या व्यक्तीवर समन्स बजावयाचे त्या व्यक्तीच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीला देता येईल व अशी प्रत मिळाल्याचे निदर्शक म्हणून मूळ समन्सच्या पुस्तकात अशा प्रौढ कुटुंबियाची प्रत मिळाल्याच्या दिनांकासह पावती घेण्यात यावी.

(३) जर योग्य ते परिश्रम घेऊनही वरील परिच्छेद १ व २ मध्ये उल्लेखलेल्या पद्धतीने समन्स बजावता येत नसेल तर समन्स बजावणारा अधिकारी, समन्सची एक प्रत जिच्यावर समन्स बजावावयाचे अशी व्यक्ती सर्वसाधारणपणे राहत असलेल्या घराच्या किंवा घरवाडीच्या एखाद्या ठळक जागी लावील आणि त्यानुसार मूळ समन्स पुस्तकात तसे केल्याचे नमूद करील.

(चार) तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी काढलेले आदेश, या आदेशानुसार बोलावयाच्या व्यक्तीवर बजावयाचे असतात.

(पाच) ग्राम पोलीस पाटलांना पाठवावयाच्या समन्सांबरोबर व आदेशांबरोबर परिशिष्ट 'क' मध्ये संक्षिप्त सूची जोडावी. ग्राम पोलीस पाटलाने समन्स किंवा आदेश बजावल्यानंतर परिशिष्ठ 'क' मधील स्तंभ क्र. तीन व चार भरावयाचे असतात व मूळ समन्स किंवा आदेश ते बजावलेल्या व्यक्तींच्या पावत्यांसह संबंधित दंडाधिकाऱ्याकडे किंवा पोलीस ठाण्याकडे परत पाठवावयाचे असतात.

(सहा) ज्याच्यावर समन्स किंवा आदेश बजावावयाचा असेल ती व्यक्ती मरण पावली असेल किंवा तिचा तपास लागू शकत नसेल किंवा दुसऱ्या कोणत्याही तालुक्याच्या ठिकाणी किंवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ती राहात असेल अशा कोणत्याही कारणांनी तिच्यावर समन्स किंवा आदेश बजावणे शक्य न झाल्यास ग्राम पोलीस पाटलाने समन्स किंवा आदेश न बजावल्याबद्दलची वस्तुस्थिति उक्त परिशिष्टाच्या स्तंभ ३ व ४ मध्ये ठळकपणे पृष्ठांकित करावी.

(सात) समन्स किंवा आदेश बजावण्यात आला असेल तेव्हा ग्राम पोलीस पाटलाने, वर सांगितल्याप्रमाणे स्तंभ भरावे आणि मूळ प्रत विहित कालमर्यादेमध्ये शक्य तो लवकर समन्स किंवा आदेश काढणाऱ्या अधिकाऱ्याकडे परत पाठवावी.

(आठ) प्रत्येक समन्स किंवा आदेश बजावल्याबद्दल फी द्यावी लागते. ग्राम पोलीस पाटलाला या पैकी अर्धी रक्कम मिळण्याचा अधिकार राहील आणि उरलेली अर्धी रक्कम इतर स्थानापन्न ग्राम कार्यकर्त्यांमध्ये सारख्याच प्रमाणात वाटावयाची असते. रक्कम मिळाल्याचा निदर्शक म्हणून ग्राम कार्यालयात पावती तक्त्यामध्ये पावती घ्यावयाची असते.

(नऊ) जर समन्स किंवा आदेश बजावला गेला नाही तर ग्राम पोलीस पाटलाला किंवा दुय्यम ग्राम अधिकाऱ्याला फी घेण्यास परवानगी असणार नाही.

(दहा) सर्वसाधारणपणे अशी फी वर्षातील प्रत्येक तिमाहीत एकदा म्हणजे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात देण्यात येईल. परंतु जर एखाद्या तालुक्यातील समन्सांची संख्या बरीच जास्त असेल तर जिल्हाधिकारी अशी फी दरमहा देण्यासंबंधी आदेश देऊ शकेल.

नमुना ' क '

बिल क्र.

(कोषागार अधिकाऱ्याने भरावयाचे)

न्यायालय : प्रकरण क्र.

पोलीस ठाणे : अपराध क्र.

निर्गमन दिनांक :

गावचे नाव :

| समन्सचा अनुक्रमांक | ज्या व्यक्तीवर समन्स (किंवा आदेश) बजावयाचे आहे त्या व्यक्तीचे नाव | बजावल्याचा दिनांक | फी ची रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

पोलीस पाटील

मंजूर केले.

प्रमाणित करण्यात येते की, या बिलासाठी मूळ समन्स किंवा आदेश योग्य रीतीने पडताळून पाहिले आहेत आणि फीसाठी मान्यता असल्याचे निदर्शक म्हणून मूळ प्रती रद्द करण्यात आल्या असून त्या ............... च्या कार्यालयात ठेवण्यात आल्या आहेत/च्या दंडाधिकाऱ्याकडे परत पाठवण्यात आल्या आहेत.

पोलीस अधिकारी/<br>दंडाधिकारी/<br>पोलीस अधिकारी.

दिनांक :